# यावल महाविद्यालयात डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचा महापरिनिर्वाण दिन साजरा

यावल (वार्ताहर) जळगाव जिल्हा मराठा विद्या प्रसारक सहकारी समाजाचे, कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, यावल येथे प्राचार्य डॉ. संध्या सोनवणे यांच्या हस्ते डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून महापरिनिर्वाण दिन साजरा करण्यात आला. या कार्यक्रमाला उपप्राचार्य प्रा. एम. डी. खैरनार यांनी डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या अनमोल कार्याबद्दल व महापरिनिर्वाण दिन का साजरा करण्यात येतो याबद्दल सखोल असे मार्गदर्शन केले.

सदर कार्यक्रमाला महाविद्यालयाचे उपप्राचार्य प्रा. ए. पी. पाटील, शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी हजर होते.

